जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2023

लोकमत



# शिवाजी विद्यापीठात भाषांतरकारांची राष्ट्रीय परिषद गुरुवारपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय अनुवाद साहित्य, भुवनेश्वर यांच्यातर्फे दि. २ व ३ नोव्हेंबर रोजी भाषांतरकारांची राष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात विविध भारतीय भाषांतील भाषांतरकार यांच्या उपस्थितीत ही परिषद संपन्न होणार आहे.

या परिषदेचे उद्घाटन भारत सरकारच्या मानवाधिकार आयोगाचे सदस्य आणि ख्यातकीर्त लेखक डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या हस्ते होईल. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. हैदराबादच्या इफ्लू युनिव्हर्सिटीच्या माजी कुलगुरू डॉ. माया पंडित परिषदेचे बीजभाषण करणार आहेत. यावेळी भारतीय अनुवाद साहित्य संस्थेचे सचिव सरत चंद्र आचार्य उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेला महाराष्ट्र, ओडिशा, आसाम, प. बंगाल, छत्तीसगढ, कर्नाटक या राज्यांतील १५० भाषांतरकार उपस्थित राहणार असल्याची माहिती परिषदेचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2023

पुढारी

# विद्यापीठात गुरुवारपासून अनुवादक राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व भारतीय अनुवाद साहित्य, भुवनेश्वर, ओडिशा यांच्या संयुक्त विद्यमाने २ व ३ नोव्हेंबर रोजी भाषांतरकारांची राष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर, भाषाभवन सभागृहात होणाऱ्या परिषदेचे उद्‌घाटन मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या हस्ते व कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. भाषांतरकार डॉ. माया पंडित परिषदेचे बीजभाषण करणार आहेत. भारतीय अनुवाद साहित्य संस्थेचे सचिव सरत चंद्र आचार्य उपस्थित राहणार आहेत. १५० हून अधिक भाषांतरकार उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2023
तरुण भारत

# विद्यापीठात २ नोव्हेंबरला अनुवादकांची परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि ओडीसा, भुवनेश्वर येथील भारतीय अनुवाद साहित्य, यांच्या संयुक्त विद्यमाने २ व ३ नोव्हेंबर रोजी 'भाषांतरकारांची राष्ट्रीय परिषद' आयोजित केली आहे. वि. स. खांडेकर, भाषाभवन सभागृहात विविध भारतीय भाषांतील अनुवादकांची उपस्थितीत ही परिषद होणार आहे. या परिषदेचे उद्घाटन भारत सरकारच्या मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या हस्ते होईल. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. हैदराबाद येथील इफ्लू युनिव्हर्सिटीच्या माजी कुलगुरू डॉ. माया पंडित यांचे बीजभाषण आहे. तसेच भारतीय अनुवाद साहित्य संस्थेचे सचिव सरत चंद्र आचार्य हे उपस्थित राहणार आहेत. या राष्ट्रीय भाषांतर परिषदेत विविध भाषांमध्ये भाषांतर करणाऱ्या लेखकांशी संवाद व चर्चादेखील करता येईल. या परिषदेस महाराष्ट्र, ओडिसा, आसाम, पश्चिम बंगाल, छत्तीसगढ, कर्नाटक या राज्यातील एकशे पन्नास अनुवादक उपस्थित राहणार आहेत. भाषा, साहित्य आणि भाषांतरविषयक अभ्यास व आस्था असणाऱ्यांनी या परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन परिषदेचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2023
सकाळ

# विद्यापीठात गुरुवारपासून भाषांतरकारांची परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय अनुवाद साहित्य भुवनेश्वर (ओडिशा) यांच्यातर्फे विद्यापीठात गुरुवारी (ता. २ नोव्हेंबर) आणि शुक्रवारी (ता. ३) 'भाषांतरकारांची राष्ट्रीय परिषद' होणार आहे. या वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहात होणाऱ्या परिषदेचे उद्‌घाटन मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होईल. भाषांतरकार डॉ. माया पंडित परिषदेचे बीजभाषण करतील. भारतीय अनुवाद साहित्य संस्थेचे सचिव सरतचंद्र आचार्य उपस्थित राहणार आहेत. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरून भारतीय भाषांमधून नवी ग्रंथनिर्मिती हा उद्देश लक्षात घेऊन आयोजित केलेली परिषद भाषा व भाषांतर धोरणांसाठी पूरक ठरणारी आहे. परिषदेत विविध भारतीय भाषांमधील भाषांतरकार विचार मांडतील. भाषांतर करणाऱ्या लेखकांशी संवाद आणि चर्चा करता येईल. महाराष्ट्र, ओडिशा, आसाम, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, कर्नाटकातील १५० भाषांतरकार परिषदेत सहभागी होतील, अशी माहिती समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2022
सकाळ

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा निर्णय : लवकरच अंमलबजावणी

# विद्यार्थ्यांना विमा कवच


**सकाळ वृत्तसेवा**

शिरोली पुलाची, ता. ३० : राज्यातील अकृषी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा आणि वैद्यकीय विमा योजना लागू केली आहे. शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्यासह जीवाची काळजी घेणारा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे योजनेची अंमलबजावणी कशी होणार; याबाबत शिक्षण क्षेत्रात उत्सुकता आहे.

धकाधकीच्या काळात अपघातांचे प्रमाण वाढले आहे. जवळपास सर्वच विद्यार्थ्यांकडे वाहने असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना, त्यांच्या आरोग्यासह जीवाचीही काळजी घेण्यासाठी विमा संरक्षण देण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला आहे. विद्यापीठ अथवा संलग्नित महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणारे विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा योजनेसाठी पात्र आहेत. प्रथम ते अंतिम वर्षापर्यंतच्या अभ्यासक्रमाचे विद्यार्थी विमा योजनेचा लाभ घेऊ शकतात. ही विमा योजना विद्यापीठ अथवा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'ऐच्छिक' आहे. योजनेत विद्यार्थ्यांना ६२ रुपयांत पाच लाखांचा अपघात विमा काढता येईल. याची जबाबदारी शासनाने नॅशनल इन्शुरन्स कंपनीकडे देण्याचा निर्णय घेतला आहे. वैयक्तिक अपघात विमा योजनेंतर्गत २० रुपयांत एक लाखांचा वैद्यकीय विमा काढता येईल. आयसीआयसीआय लोंबार्ड इन्शुरन्स कंपनीने याची जबाबदारी दिली आहे. ४२२ रूपयांत दोन लाखांच्या वैद्यकीय विमा योजनेचा लाभही घेता येईल. संबंधित प्राचार्य, कार्यालयीन अधीक्षक, विद्यापीठाचे महाविद्यालयीन विभागप्रमुख यांना भेटून लाभ घेता येणार आहे. विद्यापीठ अथवा महाविद्यालयातील ओळखपत्र, प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह शिक्का, गुणपत्रिका, जन्मतारीख अथवा बोर्ड प्रमाणपत्र, फोटो या कागदपत्रांची पूर्तता करावी लागेल.

### योजनेचे स्वरूप

- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ६२ रुपयांत पाच लाख, २० रुपयांत एक लाखाचा वैयक्तिक अपघात विमा तर ४२२ रुपयांत दोन लाखांच्या वैद्यकीय विमा योजनेचा लाभ घेता येईल.



> महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक अपघात विमा आणि वैद्यकीय विमा योजना लागू करण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सर्वार्थाने प्रयत्न होणे गरजेचे आहे.
>
> **- योगेश चव्हाण**, तालुकाप्रमुख युवासेना, हातकणंगले

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2023
सकाळ

# 'कॉपी' करताना ९४ विद्यार्थी सापडले

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेत सोमवारी कॉपी करताना एकूण ९४ विद्यार्थी भरारी पथकाला सापडले. त्यात सातारा जिल्ह्यातील ४४, कोल्हापूरमधील ४३ आणि सांगलीतील ७ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यांच्यावर परीक्षा प्रमाद समितीच्या नियमानुसार कारवाई होणार आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दिवसभरात विविध सत्रांमध्ये एकूण २७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेतल्या. विद्यापीठातील अधिविभाग आणि कार्यक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयांतून ४५ हजार ४६९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ
31 OCT 2023
तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षेत ९४ कॉपीचे प्रकार उघडकीस

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा २० ऑक्टोबरपासून सुरू झाल्या आहेत. या परीक्षेला दररोज ५०पेक्षा जास्त कॉपीचे प्रकार उघडकीस येत आहेत. सोमवारी २७ विषयांची परीक्षा ४५ हजार ४६९ विद्यार्थ्यांनी दिली. या परीक्षेत भरारी पथकाकडून सांगलीत ७, कोल्हापूरात ४३, साताऱ्यात ४४ असे तिन्ही जिल्ह्यातून ९४ कॉपीचे प्रकार उघडकीस आले. भरारी पथकाकडून नोंदीत दोषी विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीमार्फत कारवाई करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 OCT 2023

महासत्ता

# कुरुंदवाडचे एस.के.पाटील महाविद्यालय व्हॉलीबॉल स्पर्धेत प्रथम

## वडूज येथे आंतरविभागीय स्पर्धा संपन्न

वडूज,ता.२९(वार्ताहर)–

वडूज (ता.खटाव) येथील दादासाहेब जोतीराम गोडसे महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत कुरूंदवाड (जि.कोल्हापूर) येथील एस.के.पाटील महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळवित विद्यापीठाचा फिरता चषक पटकविला.



वडूज : शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या कुरुंदवाड येथील एस.के.पाटील महाविद्यालयास फिरता चषक देताना मान्यवर.

तर मुरगूड (जि.कोल्हापूर) येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकविला. याशिवाय या स्पर्धेत अर्जुननगर (जि.कोल्हापूर) येथील देवचंद महाविद्यालयाने तृतीय तर कागल (जि.कोल्हापूर) येथील डी.आर.माने महाविद्यालयाने चतुर्थ क्रमांक पटकविला. विजेत्या संघांना हरणाई सुतगिरणीचे संस्थापक रणजितसिंह देशमुख, तालुका कृषी अधिकारी राहूल जीतकर, वन अधिकारी सागर मगर,संस्थेचे उपाध्यक्ष पृथ्वीराज गोडसे, प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, विद्यापीठाच्या व्हॉलीबॉल निवड समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ.स्वप्नील पाटील,सदस्य प्रा.डॉ.राहूल इंगळे, डॉ.संदिप पाटील, स्पर्धा निरीक्षक प्रा.डॉ. एन. डी. पाटील, प्रा. डॉ. सुनिल चव्हाण आदी मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. प्रा. डॉ. क्षितीज धुमाळ यांनी सुत्रसंचालन केले. प्रा.डी.एन.कंठरे यांनी आभार मानले.